# सार्वजनिक वितरण प्रणाली व ग्राहक संरक्षण

**प्र.२ ख़लील प्रशनंची एक ते दोन वाक्यत उत्तर लिहा**

**१. भारतातील सार्वजनिक वितरण प्रणाली म्हणजे काय?**

**उत्तर:** i. सार्वजनिक वितरण प्रणाली ही भारत सरकारने सुरू केलेली अन्न सुरक्षा व्यवस्था असून या व्यवस्थेद्वारे भारतातील गरजू लोकांना अन्नघटक आणि बिगरअन्न घटक यांचे सवलतीच्या दरात वितरण केले जाते.

ii. यासाठी देशात अनेक स्वस्त धान्य दुकाने स्थापन केली आहेत.

**२. भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे लोकांना कोणत्या अन्नघटकांचे वितरण केले जाते?**

**उत्तर:** गहू, तांदूळ आणि साखर यांसारख्या अन्नघटकांचे सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे लोकांना वितरण केले जाते.

**३. भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारा लोकांना कोणात्या बिगर अन्नघटकांचे वितरण केले जाते?**

**उत्तर:** कापड आणि केरोसिन या बिगर अन्नघटकांचे सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे लोकांना वितरण केले जाते.

**४. देशाच्या विविध राज्यांमध्ये स्वस्त धान्याची अनेक दुकाने का स्थापन करण्यात आली आहेत?**

**उत्तर:** i. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे भारतातील गरजू लोकांना गहू, तांदूळ, साखर यांसारखे अन्नघटक तसेच कापड, केरोसिन यांसारखे बिगरअन्नघटक यांचे सवलतीच्या दरात वितरण केले जाते.

ii. यासाठी देशाच्या विविध राज्यांमध्ये स्वस्त धान्याची अनेक दुकाने स्थापन करण्यात आली आहेत.

**५. कोणत्या दोन सरकारांनी सार्वजनिक वितरण प्रणालीची जबाबदारी घेतली आहे?**

**उत्तर:** केंद्र सरकार व राज्य सरकार या दोघांनी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी विभागून घेतली आहे.

**६. भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत केंद्र सरकारची जबाबदारी काय असते?**

**उत्तर:** भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत अन्नधान्याची साठवण, वाहतूक आणि विभाजनाची जबाबदारी केंद्र सरकारची असते.

**७. भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत राज्य सरकारची जबाबदारी काय असते?**

**उत्तर:** भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत स्वस्त धान्य दुकानांद्वारे ग्राहकांना अन्नधान्याचे वितरण करण्याची जबाबदारी राज्य सरकारची असते.

**८. भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत राज्य सरकारचे कार्यात्मक उपक्रम कोणते?**

**उत्तर:** भारतात सार्वजनिक वितरण प्रणालीत राज्य सरकारचे कार्यात्मक उपक्रम पुढीलप्रमाणे:

i. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची माहिती मिळवणे.

ii. शिधापत्रिकांचे वितरण.

iii. स्वस्त धान्य दुकानांच्या कामाचे पर्यवेक्षण.

## ४.३ सार्वजनिक वितरण प्रणालीची उद्दिष्टे

***९. सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्दिष्टे कोणती? [ऑक्टोबर १४, मार्च १५, १६]**

**उत्तर:** सार्वजनिक वितरण प्रणालीची मुख्य उद्दिष्टे:

i. उपभोक्त्यांना स्वस्त आणि सवलतीच्या दरात अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.

ii. लोकसंख्येचा किमान पोषणात्मक दर्जा टिकवून ठेवणे.

## ४.४ सार्वजनिक वितरण प्रणालीची प्रगती

**१०. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे झालेल्या अन्नधान्याच्या उचलमध्ये घट का झाली आहे?**

**उत्तर:** सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे झालेल्या अन्नधान्याच्या उचलमध्ये घट होण्याचे कारण म्हणजे गहू आणि तांदळाच्या खुल्या बाजारातील किमती आणि सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे निर्धारित केलेल्या किमती यांतील तफावत कमी झाली आहे.

**११. भारतात लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचे मुख्य उद्दिष्ट काय आहे?**

**उत्तर:** i. लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे दारिद्र्यरेषेवरील गरजू कुटुंबांसाठी वाजवी किमतीत, तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी अतिशय कमी किमतीत धान्याचे वितरण करणे.

ii. जून १९९७ पासून ही दुहेरी किंमत रचना सुरू करण्यात आली.

**१२. भारतामध्ये शिधापत्रिकेचे महत्त्व विशद करा.**

**उत्तर:** i. सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये धान्याच्या वितरणासाठी शिधापत्रिका आवश्यक ठरते.

ii. त्यावर कुटुंबातील सदस्य संख्येची माहिती असते, त्यानुसार ठरावीक स्वस्त धान्याच्या दुकानातून शिधावाटप केले जाते.

**१३. महाराष्ट्रात कोणत्या कुटुंबाला शुभ्र (सफेद) शिधापत्रिका दिली जाते?**

**उत्तर:** i. महाराष्ट्र शासन प्रत्येकाच्या आर्थिक स्तरानुसार विशिष्ट रंगाची शिधापत्रिका देते.

ii. साधारणपणे वार्षिक उत्पन्न ₹ १ लाखापेक्षा जास्त असलेल्या कुटुंबांना शुभ्र (सफेद) रंगाच्या शिधापत्रिका देण्यात येतात.

**१४. सार्वजनिक वितरण प्रणालीचा लाभ कोणाला मिळत नाही? [मार्च १४]**

**किंवा**

***सार्वजनिक वितरण प्रणालीच्या लाभातून कोणाला वगळण्यात येते?**

**उत्तर:** शुभ्र रंगाच्या शिधापत्रिका असणाऱ्या कुटुंबांना, ज्यांचे वार्षिक उत्पन्न ₹ १ लाखापेक्षा जास्त आहे त्यांना सार्वजनिक वितरणाच्या लाभातून वगळण्यात येते. या कुटुंबांचा आर्थिक स्तर उच्च असतो.

**१५. कोणत्या कुटुंबांना केशरी रंगाची शिधापत्रिका देण्यात येते?**

**उत्तर:** वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ₹ २५ हजार ते ₹ १ लाख आहे अशा कुटुंबांना केशरी रंगाची शिधापत्रिका देण्यात येते.

**१६. महाराष्ट्रात केशरी शिधापत्रिका असणाऱ्यांना कोणते फायदे मिळतात?**

**उत्तर:** महाराष्ट्रात केशरी शिधापत्रिका धारकांना बाजारभावापेक्षा कमी दराने दरमहा ५ किलो तांदूळ, ५ किलो गहू तसेच २ लीटर रॉकेल वितरित केले जाते.

**१७. महाराष्ट्रात पिवळी शिधापत्रिका असणाऱ्यांना कोणते फायदे मिळतात?**

**उत्तर:** i. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना पिवळ्या रंगाची शिधापत्रिका दिली जाते.

ii. महाराष्ट्रात पिवळ्या रंगाची शिधापत्रिका असणाऱ्यांना सवलतीच्या दराने दरमहा २५ किलो तांदूळ व १० किलो गहू वितरित केला जातो.

**१८. 'अंत्योदय योजने' चे लक्ष्य कोणते?**

**उत्तर:** अतिनिम्न आर्थिक स्तर असलेल्या कुटुंबांसाठी अत्यंत कमी किमतीत अन्नधान्याचे वितरण करणे हे 'अंत्योदय योजने' चे लक्ष्य आहे.

**१९. निराधार योजनेचे लक्ष्य काय आहे?**

**उत्तर:** निराधार योजनेच्या अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक शिधापत्रिका धारकाला सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे दरमहा १० किलो तांदूळ मोफत दिले जातात.

२०. ***सार्वजनिक वितरण प्रणालीचे कोणतेही दोन फायदे लिहा.** **[मार्च १५, जुलै १६]**

**किंवा**

**'सार्वजनिक वितरण प्रणाली भारतात उपयुक्त आहे'. स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. सार्वजनिक वितरण प्रणाली गरीब जनतेला सवलतीच्या दरात धान्यपुरवठा करण्यासाठी उपयुक्त ठरते.

ii. शिधावाटप दुकानदार, त्यांचा नोकरवर्ग आणि इतर संबंधित कामगारांना रोजगार मिळतो.

iii. दारिद्र्य आणि आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

म्हणून, सार्वजनिक वितरण प्रणाली भारतात उपयुक्त आहे.

## ४.६ उणिवा दूर करण्याचे उपाय

**२१. अन्नधान्यांचा साठा व्यवस्थितरीत्या कसा संग्रहित करता येईल?**

**उत्तर:** प्रत्येक राज्यात अन्न बँका स्थापन करून व सरकारी गोदामांचे आधुनिकीकरण करून अन्नधान्याचा साठा व्यवस्थितरीत्या संग्रहित करता येईल.

## ४.७ ग्राहक संरक्षण

**२२. ग्राहक संरक्षण कायद्याची मुख्य उद्दिष्टे कोणती? [मार्च १४, जुलै १५, जुलै १६]**

**उत्तर:** ग्राहक संरक्षण कायद्याची मुख्य उद्दिष्टे:

i. ग्राहकांना चांगले व परिपूर्ण संरक्षण देणे.

ii. ग्राहकांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठी सुलभ आणि वेगवान यंत्रणेची तरतूद करणे.

**२३. ग्राहकांना वस्तू आणि सेवांबद्दल कोणती माहिती देणे आवश्यक असते?**

**उत्तर:** वस्तू व सेवांची गुणवत्ता, शुद्धता, किंमत, नगसंख्या, प्रमाणीकरण यांबाबत अचूक माहिती ग्राहकांना देणे आवश्यक असते.

**२४. ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेमध्ये कुठल्या आयोगांचा समावेश होतो?**

**उत्तर:** ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेमध्ये पुढील आयोगांचा समावेश होतो:

i. जिल्हा मंच

ii. राज्य आयोग

iii. राष्ट्रीय आयोग

***२५. अन्नभेसळ म्हणजे काय?**

**[ऑक्टोबर १४, जुलै १५, मार्च १६]**

**उत्तर:** i. अन्नभेसळ म्हणजे अन्नपदार्थांची गुणवत्ता कमी करणारे व त्यांचे प्रमाण वाढवणारे घटक त्यात मिसळण्याची प्रक्रिया होय.

ii. अन्नभेसळीमुळे समाजाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

**२६. भेसळीचे दृश्य स्वरूपाचे घटक म्हणजे काय?**

**उत्तर:** I. भेसळीचे असे घटक, जे ग्राहक अन्नपदार्थांतून सहजपणे काढून टाकू शकतात, त्यांना भेसळीचे दृश्य स्वरूपाचे घटक म्हणतात.

ii. उदा. खडे, पाने, माती इ.

**२७. भेसळीचे अदृश्य स्वरूपाचे घटक म्हणजे काय?**

**उत्तर:** i. काही भेसळीचे घटक अदृश्य असतात आणि ते सहजरीत्या काढून टाकता येत नाहीत, म्हणून ते अतिशय हानिकारक असतात.

ii. यामध्ये दुधात पाण्याची किंवा रसायनांची भेसळ करणे, डाळींना कृत्रिम रंग लावणे यांचा समावेश होतो.

**२८. अन्नभेसळ थांबविणे ही सर्वांची नैतिक जबाबदारी का आहे?**

**उत्तर:** i. अन्नभेसळीचा समाजाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे हा एक गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा आहे.

ii. म्हणूनच, सुदृढ आणि सशक्त भारतासाठी अन्नभेसळ रोखणे ही सर्वांची नैतिक जबाबदारी आहे.

**प्र.३. पुढील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यांत उत्तरे लिहा.**

## ४.४ सार्वजनिक वितरण प्रणालीची प्रगती

**१. भारतातील सार्वजनिक वितरण प्रणालीची प्रगती स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. १९४३ च्या बंगालच्या दुष्काळानंतर लगेचच सार्वजनिक वितरण प्रणाली अस्तित्वात आली.

ii. या योजनेच्या अंतर्गत, देशभरातील गरीब व गरजू लोकांना स्वस्त धान्य दुकानांद्वारे वाटप करण्याचे महत्त्वाचे जाळे विस्तारण्यात आले.

iii. भारतात स्वस्त धान्य दुकानांची संख्या १९६० मध्ये सुमारे ४७ हजार होती.

iv. १९९९ मध्ये ती ४.५८ लाख झाली. ही संख्या २००२ मध्ये ४.७४ लाख, तर २०११ मध्ये ४.९९ लाख एवढी वाढली.

v. १९९१-९२ यावर्षी झालेली धान्याची उचल जवळजवळ १९ दक्षलक्ष टन होती.

## ४.५ सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा

**२. स्थलांतरित कामगार व बेघर लोक सार्वजनिक वितरण प्रणालीपासून वंचित का राहतात?**

**उत्तर:** i. १९४३ च्या बंगालच्या दुष्काळानंतर लगेचच सार्वजनिक वितरण प्रणाली अस्तित्वात आली.

ii. सार्वजनिक वितरण प्रणाली ही भारत सरकारने सुरू केलेली अन्न सुरक्षा व्यवस्था आहे.

iii. सार्वजनिक वितरण प्रणालीत फक्त शिधापत्रिका धारकांनाच अन्नधान्य पुरविले जाते.

iv. शिधापत्रिका वास्तव्याच्या पत्त्यानुसारच दिल्या जातात त्यामुळे बेघर आणि स्थलांतरित कामगारांना याचा लाभ घेता येत नाही.

म्हणून, स्थलांतरित कामगार व बेघर लोक सार्वजनिक वितरण प्रणालीपासून वंचित राहतात.

***३. सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा स्पष्ट करा.**

**[मार्च १४, जुलै १६]**

**उत्तर:** सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा पुढीलप्रमाणे:

i. **गरिबांना मर्यादित फायदा:**

अ. सार्वजनिक वितरण प्रणालीत फक्त शिधापत्रिका धारकांनाच अन्नधान्य पुरवले जाते.

ब. शिधापत्रिका वास्तव्याच्या पत्त्यानुसार दिल्या जातात.

क. म्हणून, स्थलांतरित कामगार व बेघर लोकांना याचा लाभ मिळत नाही.

ii. **प्रादेशिक विषमता:**

अ. काही प्रदेश जास्त विकसित, तर काही प्रदेश कमी विकसित असतात.

ब. काही ठिकाणी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या जास्त असते.

क. परंतु, त्या प्रमाणात सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे अन्नधान्याची उचल होत नाही.

ड. या प्रादेशिक विषमतेमुळे बरेचसे लोक सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या लाभांपासून वंचित राहतात.

**iii. शहरी पूर्वग्रह:**

अ. जवळजवळ ७५ % स्वस्त धान्य दुकाने ग्रामीण भागात आहेत; परंतु सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे धान्याची जी उचल होते, त्याचे प्रमाण शहरी भागात जास्त आहे.

ब. ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था शहरांप्रमाणे कार्यक्षम नसते.

क. बऱ्याचदा, ग्रामीण भागातील अनेक स्वस्त धान्य दुकानांत रॉकेल किंवा अन्नधान्य उपलब्ध नसते.

**iv. भारतीय अन्न महामंडळाची अकार्यक्षमता:**

अ. स्वस्त धान्य दुकानांना वितरणासाठी अन्नधान्याचा पुरवठा करणे हे भारतीय अन्न महामंडळाचे काम आहे.

ब. परंतु, त्यात काही उणिवा आहेत.

क. अतिरिक्त अन्नसाठ्याचे योग्य संग्रहण होत नाही.

ड. त्यामुळे, काही वेळा उत्पादन वाढले, तरी ते लोकांपर्यंत पोहोचत नाही.

## ४.६ उणिवा दूर करण्याचे उपाय

***४. सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा दूर करण्यासाठी कोणते उपाय सुचविले आहेत?**

**उत्तर:** सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा दूर करण्याचे काही उपाय पुढीलप्रमाणे:

i. **अन्न बँकांची स्थापना:**
प्रत्येक राज्यात अन्न बँका स्थापन करणे व सरकारी गोदामांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे, अन्नधान्याचा साठा व्यवस्थितरीत्या संग्रहित करता येईल.

ii. **सार्वजनिक वितरण प्रणालीच्या व्याप्तीत वाढ:**
सार्वजनिक वितरण प्रणालीची व्याप्ती अधिक विस्तृत करावी त्यामुळे कोणीही गरजू व्यक्ती सार्वजनिक वितरण प्रणालीच्या लाभांपासून वंचित राहणार नाही.

iii. **सार्वजनिक वितरण प्रणालीची पुनर्रचना:**

अ. सार्वजनिक वितरण प्रणालीतील गैरप्रकारांना आळा घालणे गरजेचे आहे.

ब. शिधावाटप अधिकाऱ्यांनी दुकानदारांना वारंवार भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत.

क. भरारी पथकाद्वारे छापे घालून बनावट शिधापत्रिका नष्ट करणे आवश्यक आहे.

ड. वस्तूंच्या हाताळणीवरील खर्च आणि वाहतुकीवरील खर्च कमी केला पाहिजे.

***५. व्यापारातील सर्वसामान्य गैरप्रकार कोणते?**

**[ऑक्टोबर १४, मार्च १५]**

**उत्तर:** व्यापारातील सर्वसामान्य गैरप्रकार खालीलप्रमाणे आहेत:

i. भेसळयुक्त वस्तूंची विक्री करणे.

ii. दोषयुक्त (सदोष) वस्तूंची विक्री करणे.

iii. चुकीच्या वजनांचा व मापाचा वापर करणे.

iv. साठेबाजी व काळाबाजार करणे.

v. निश्चित केलेल्या कमाल विक्री किमतीपेक्षा (MRP) अधिक दर आकारणे.

vi. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती देणे.

**६. ग्राहकांचे अधिकार स्पष्ट करा.**

**[मार्च १६]**

**किंवा**

***ग्राहकांचे कोणतेही दोन अधिकार स्पष्ट करा.**

**उत्तर:** ग्राहक संरक्षण कायद्यानुसार (१९८६) ग्राहकांचे अधिकार पुढीलप्रमाणे आहेत:

**i. सुरक्षिततेचा अधिकार:**

अ. आरोग्याला व जीवनाला अपायकारक वस्तू आणि सेवांपासून ग्राहकांना संरक्षण मिळाले पाहिजे.

ब. उदा. दोषयुक्त वाहने, निकृष्ट प्रतीची विजेची उपकरणे, हानिकारक कीटकनाशके इत्यादींपासून संरक्षण.

ii. **माहिती मिळवण्याचा अधिकार:**

वस्तू व सेवांची गुणवत्ता, शुद्धता, किंमत, नगसंख्या, प्रमाणीकरण यांबाबत अचूक माहिती ग्राहकाला मिळाली पाहिजे.

iii. **निवड करण्याचा अधिकार:**

ग्राहकांना त्यांच्या खरेदीक्षमतेनुसार व पसंतीनुसार वस्तू व सेवांची निवड करण्याचा अधिकार आहे.

iv. **तक्रार ऐकवण्याचा अधिकार:**

उत्पादक आणि वितरकांना उत्पादनाविषयीचे आपले मत ऐकविण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.

v. **तक्रार निवारण्याचा अधिकार:**

अ. वस्तू आणि सेवांच्या किमती व गुणवत्तेसंबंधीच्या तक्रारींचे निवारण करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.

ब. विक्रेत्याने किंवा उत्पादकाने ग्राहकाला आवश्यक असल्यास वस्तू बदलून किंवा दुरुस्त करून दिली पाहिजे.

क. ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेमध्ये जिल्हा मंच, राज्य आयोग व राष्ट्रीय आयोग यांचा समावेश होतो.

**vi. ग्राहक शिक्षणाचा अधिकार:**

व्यापारातील गैरप्रकार रोखण्यासाठी संबंधित कायद्यांची माहिती करून घेण्याचा तसेच तक्रार करण्याच्या प्रक्रियेचा पाठपुरावा करण्याचा अधिकार ग्राहकांना आहे.

**vii. स्वच्छ पर्यावरणासंबंधी अधिकार:**

अ. प्रत्येकाला प्रदूषणमुक्त पर्यावरण उपभोगण्याचा अधिकार आहे.

ब. ग्राहकाच्या वस्तीत कोणी कचरा, हवा, पाणी, ध्वनी इ. मुळे प्रदूषण निर्माण करत असेल, तर ग्राहकाला त्याबद्दल तक्रार नोंदवून तिचे निवारण करण्याचा अधिकार आहे.

***७. ग्राहकांची कर्तव्ये स्पष्ट करा.** **[जुलै १५]**

**उत्तर:** ग्राहकांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे:

i. व्यवसायातील गैरप्रकार रोखण्यासाठी गुणवत्तेबाबत आणि हक्कांबाबत जागृत राहणे.

ii. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींपासून सावध राहणे.

iii. विक्रेत्याला देयक (बिल), पावती, हमीपत्र (गॅरंटी कार्ड), प्राश्वासनपत्र (वॉरंटी कार्ड) देण्यासाठी ठामपणे सांगणे.

iv. वस्तूची गुणवत्ता, किंमत, टिकाऊपणा, विक्रीपश्चात सेवा इ. तुलना करणे.

v. विविध वस्तूंची काळजीपूर्वक तपासणी करणे व सर्वोत्तम निवड करणे.

***८. अन्नभेसळीचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लिहा.**

**उत्तर:** i. अन्नभेसळीमुळे ताप, उलट्या आणि मळमळ होऊ शकते.

ii. याच्यामुळे घशाचे आजार, खोकला आणि पचनसंस्थेशी संबंधित आजार उद्‍भवतात जसे – अतिसार आणि पोटदुखी.

iii. त्याचबरोबर आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात जसे कर्करोग, पक्षाघात, त्वचेचे व डोळ्यांचे विकार इ. तर काही वेळा मृत्यूदेखील ओढवतो.

iv. अन्नभेसळीचा समाजाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.